MHSN120009122025

**दाखल दिनांक – १४.१०.२०२५**

**नोंदणी दिनांक – १४.१०.२०२५**

**निकाल दिनांक – ०१.०४.२०२६**

**कालावधी – ०० वर्ष, ०५ महिने, १८ दिवस.**

**पलूस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – एम.ए.एम.जे. शेख)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५१३/२०२५**

**नि.क्र.**

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र सरकार तर्फे – दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क सांगली.**

**अभियोग पक्षातर्फे** श्री.आर.आर. चांगण, सहा. सरकारी अभियोक्ता.

विरूध्द

**आरोपी** **शिवाजी विठ्ठल पाटील,**
वय – ५९ वर्षे, धंदा – मजुरी,
रा.भिलवडी, ता.पलूस, सांगली.

**आरोपींतर्फे वकील** श्री.के.वाय. दळवी.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | ०६.०९.२०२५ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | १२९/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १४.१०.२०२५ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १४.१०.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | ०७.०३.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | | ०१.०४.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | | ०१.०४.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| अनु-क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा-तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | भा.ना.सु. सं.क. ४६८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिवाजी विठ्ठल पाटील | भा.ना.सु.सं. २०२३ चे कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | १४.१०.२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदाराची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | आनंदा बुवाजी शेळके | ८ सोबत | पंच |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.१० | घटनास्थळ वजा जप्ती पंचनामावरील सहीपुरती निशाणी |

**– न्यायनिर्णय –**

**(घोषणा तारीख– ०१.०४.२०२६)**

प्रस्तूतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) या अपराधासाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

फिर्यादी– पी.एच. पाटील, महिला जवान राज्य उत्पादन शुल्क, सांगली यांनी दि.०६.०९.२०२५ रोजी फिर्याद देवून असे कथन केले आहे की, दि.०६.०९.२०२५ रोजी फिर्यादी कर्तव्यावर हजर असताना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, विनाफलक हातगाडी, सुंधा बेकरीच्या पाठीमागे, बस स्थानकासमोर भिलवडी येथे एक इसम बेकायदेशिररित्या विनापरवाना देशी दारुची चोरुन विक्री करीत आहे. त्यानंतर ते स्वतः व इतर पोलीस कर्मचारी व पंच असे सर्वजण घटनास्थळी गेले असता तेथे त्यांना एक इसम हातगाडी घेवून असलेला मिळून आला. त्याला त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव शिवाजी विठ्ठल पाटील असे सांगितले व हातगाडीची तपासणी केली त्यामध्ये देशी दारुच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्या अंदाजे किंमत र.रु.१४००/– व देशी दारु टँन्गो पंचच्या ९० मिलीच्या २० सिलबंद बाटल्या अंदाजे किंमत र.रु.८००/– व एक कापडी पिशवी अंदाजे किंमत र.रु.२०/– असे मिळून आल्याने जप्ती पंचनामा करुन जप्त केले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर १२९/२०२५ ने नोंदविली व सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी यांनी करुन तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये प्रतिकथन (निशाणी क्र.८) नोंदवून तो त्याला वाचून दाखवला असता त्याने

त्याचेवरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली आहे. अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ प्रमाणे निवेदन वगळण्यात आले.

५. सन्माननीय सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

६. उभय पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता खालील निर्णय प्रश्न उपस्थित झाले. त्या निर्णय प्रश्नांचे कारणासहीत माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दि.०६.०९.२०२५ रोजी १६–०० ते १७–०० वाजताच्या सुमारास सुंधा बेकरीच्या पाठीमागे, भिलवडी बस स्टॅन्डसमोर एका विनाफलक हातगाडीमध्ये भिलवडी, ता.पलूस, जि.सांगली येथे आरोपी हा गैरकायदा विनापरवाना देशी दारुच्या एकूण ३५ सिलबंद बाटल्या व देशी दारु टँन्गो पंचच्या एकूण २० सिलबंद बाटल्या विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगताना मिळून आला व त्याअन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी** |
| **२.** | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## – कारणमिमांसा –

**मुद्दा क्रमांक १ बाबत –**

७. आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षास आरोपीने विनापरवाना देशी दारुच्या एकूण ३५ सिलबंद बाटल्या व देशी दारु टॅंन्गो पंचच्या एकूण २० सिलबंद बाटल्या बाळगुन विक्री करताना मिळून आला ही बाब शाबीत करणे आवश्यक होते. ते सिध्द करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षाने त्याची भिस्त पंच साक्षीदार क्र.१ आनंदा बुवाजी शेळके यांची साक्ष नोंदविली आहे. त्यांनी साक्षीपुराव्यादरम्यान असे सांगीतले की, दि.०६.०९.२०२५ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याला बोलावले नव्हते तसेच, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नसल्याचे कथन केले. पुढे साक्षीदाराने हे कथन केले की, घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावर त्याची अ.क्र.१ वर सही (निशाणी क्र.१०) आहे परंतु, त्यातील मजकुराबाबत त्यांना माहित नाही. सदर पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनेस सहकार्य न केल्यामुळे सदर साक्षीदाराचा अभियोगपक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला परंतु, त्यामध्ये देखील अभियोग पक्षाला सहकार्य करणारा पुरावा पटलावर आला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाचे कथन ख–या अर्थाने सिध्द झालेले नाही. वरील पंच साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने पुढे आणखी साक्षीदार तपासून अभियोग पक्षाला फायदा होईल असे वाटत नसल्याने, अभियोगपक्षाला पुरेशी संधी दिल्यानंतर अभियोगपक्षाचा पुरावा नि.१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला.

८. आरोपीच्या ताब्यातून विनापरवाना देशी दारु व देशी दारु टॅंन्गो पंचच्या बाटल्या जप्त करुन तसा पंचनामा त्याच्यासमक्ष केल्याचे सदर पंच साक्षीदाराने कुठेही सांगीतले नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाचे कथन तसेच जप्ती ही ख–या अर्थाने सिध्द झाले नाही.

९. अभियोगपक्षातर्फे फिर्यादी, तपासी अंमलदार व इतर साक्षीदार यांची

साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. पंच साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही साक्षीदाराचा साक्षीपुरावा अभियोगपक्षातर्फे नोंदवण्यात आलेला नाही. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक तपासणीचा अहवाल देखील पटलावर दाखल नाही. आरोपीविरूध्द कोणताही सबळ व ठोस असा साक्षीपुरावा पटलावर उपलब्ध नाही. आरोपीच्या ताब्यातून कथितरित्या जप्त करण्यात आलेले द्रव्य हे दारु असल्याचे निःशंकपणे सिध्द झालेले नाही. एकंदरीतच कथित जप्तीच्या कार्यवाही संदर्भात व मुद्देमालासंदर्भात साशंकता निर्माण होते व अभियोगपक्षाच्या कथनेमध्ये रास्त संशयास जागा निर्माण होते. अशा परिस्थितीत, आरोपीच्या ताब्यामध्ये देशी दारु बाटल्या बेकायदेशीररित्या मिळून आल्याची बाब निःशंकपणे सिध्द होत नाही. करिता, मुद्दा क्र.१ वरील निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत –</u>**

**१०.** अपिल कालावधीनंतर प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमालाची योग्य ती विल्हेवाट लावण्याकरीता सदर मुद्देमाल संबंधित राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे नियमाप्रमाणे पाठवण्याबाबत आदेश करणे न्यायोचित ठरते.

**११.** उपरोक्त चर्चेवरुन असे निष्पन्न होते की, आरोपी हा त्याच्या ताब्यामध्ये अनधिकृतरित्या प्रतिबंधीत देशी दारु बाळगुन होता, ही बाब उपलब्ध पुराव्यावरुन संशयापलीकडे सिध्द झालेली नाही. त्यामुळे, संशयाचा फायदा आरोपीच्या हक्कात जाऊन तो निर्दोष सुटण्यास पात्र ठरतो. करीता, मुद्दा क्र. २ चे उत्तरार्थ मी पुढील आदेश करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी– शिवाजी विठ्ठल पाटील यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक जातमुचलका रद्द करण्यात येते.

३. कॅश सिक्युरिटी जमा असल्यास ती अपील कालावधीनंतर आरोपीस परत करण्यात यावी.

४. जप्त मुद्देमाल देशी दारु संत्राच्या अंदाजे किंमत र.रु.१४००/– एकूण ३५ बाटल्या व देशी दारु टँन्गो पंचच्या अंदाजे किंमत र.रु.८००/ एकूण बाटल्या २० हे अपिल कालावधीनंतर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४९८ अन्वये योग्य ती विल्हेवाट लावण्याकरीता संबंधित राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे नियमाप्रमाणे पाठवण्यात याव्या. तसेच, एक जप्त कापडी पिशवी अंदाजे किंमत र.रु.२०/– अपिल कालावधीनंतर लिलाव करुन रक्कम शासन जमा करण्यात यावे.

५. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ अंतर्गत वैयक्तीक जातमुचलका न्यायालयात सादर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

SHAIKH MOHAMMED AAMER
Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.04.01 16:44:12 +0530

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दिनांक– ०१.०४.२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पलूस.**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 01.04.2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 01.04.2026 |
| Judgment uploaded on | : | 02.04.2026 |